प्रत मिळाली
08/06/2019

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** कराड शहर **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0369 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/06/2019 03:08 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ (सुधारित 2018) | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
   **Date From (दिनांक पासून):** 07/06/2019
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 07/06/2019
   **Time From (वेळेपासून):** 17:14 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 17:14 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/06/2019 **Time (वेळ):** 02:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 004 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/06/2019 03:08 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 01 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भुमि अभिलेख कराड कार्यालयात

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** हर्षद दत्तात्रय बदामी

(b) **Father's Name (वडील का नाव) :** दत्तात्रय बदामी

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1987 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.**(अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 468, सोमवार पेठ,कराड,कराड शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 468, सोमवार पेठ,कराड,कराड शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-8329406128

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | आनंदराव विठ्ठल माने | | | 1. निढवळ, पो वडुज ता खटाव जि स, कराड शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम सूचना तथ्य ):

खबरी जबाब दिनांक 08/06/2019मी, हर्षद दत्तात्रय बदामी वय- 32 वर्षे, व्यवसाय- बांधकाम,रा.468, सोमवार पेठ,कराड ता.कराड जि. सातारा मोबाईल नंबर 8329406128समक्ष कराड शहर पोलीस स्टेशन मध्ये हजर होवून खबरी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझी आई व वडिल यांचे समवेत एकत्रात राहणेस आहे. मी मागील चार वर्षा पासुन कराड शहरामध्ये बांधकाम व्यवसाय करीत आहे. माझ्या नावावर कराड येथे नगर भुमापन क्रमांक 168, 168/1,168/2 असे मिळुन तीन भुखंड असुन त्या तीन्ही भुखंडाचे एकत्रीकरण करुन त्याठिकाणी एकच इमारत बांधण्याची असल्याने मी तीन्ही भुखंडाचे एकत्रीकरण करण्यासाठी मा.उपअधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय कराड यांच्याकडे दिनांक 29/10/2018 रोजी रितसर लेखी अर्ज सादर केला होता. त्यानंतर तो अर्ज उप अधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, कराड या ठिकाणी काम करणारे श्री. माने यांच्याकडे पुढील कामाकरीता गेला. त्यानंतर भूमी अभिलेख कार्यालयाने दिनांक 06/02/2019 रोजी मला व सर्व लगतदार यांना नोटीसा काढल्या व दि.22/02/2019 रोजी मोजणीची तारीख नेमली. दिनांक 22/02/2019 रोजी मोजणीसाठी श्री.माने हे नमुद क्षेत्रामध्ये आले अराता लगतदार यांनी त्यांना आम्हाला अद्याप नोटीसा मिळाल्या नाहीत असे सांगितल्याने श्री. माने यांनी माझा तसा जबाब नोंदविला व त्यादिवशी मोजणीकेली नाही. त्यानंतर भूमी अभिलेख कार्यालयाने दिनांक 02/03/2019 रोजी मला व सर्व लगतदार यांना पुन्हा नोटीसाकाढुन मोजणीची तारीख दिनांक 12/03/2019 रोजी नेमली. दिनांक 12/03/2019 रोजी मोजणी करीता श्री.माने हे पुन्हा आले त्यावेळी त्यांनी माझ्या क्षेत्राची मोजणी केली व माझा मोजणी झाले बाबत जबाब नोंदविला व ते निघुन गेले.दि.03/06/2019 रोजी मी भूमी अभिलेख कार्यालय, कराड या ठिकाणी जावुन श्री. माने यांची माझ्या कामा संदर्भात भेट घेतली. त्यावेळी आमच्यामध्ये माझ्या भूखंड एकत्रीकरणाच्या कामासंबंधाने चर्चा झाली. त्यावेळी मी त्यांना माझे काम कधी होईल अशी विचारणा केली असता त्यांनी मला तुमचे काम करून देतो, त्याकामासाठी तुम्ही मला 15,000/- रूपये द्या असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना एवढे पैसे? असे विचारले असता त्यांनी मला, त्या शिवाय तुमचे काम होणार नाही, तुम्ही मला शुक्रवारी पैसे घेवुन या व भेटा असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने हो म्हणुन तेथुन निघुन आलो. भूमी अभिलेख कार्यालय, कराड येथील श्री. माने साहेब हे 15000/- रूपये घेतल्याशिवाय माझे भूखंड एकत्रीकरणाचे काम करून देणार नाहीत अशी माझी खात्री झाली असुन मी दिनांक 07/06/2019 रोजी भुमि अभिलेख कार्यालय कराड या ठिकाणी जावुन श्री माने यांची भेट घेवुन माझ्या कामाबाबत चर्चा करणार असुन त्यांनी मागणी केलेली 15000/- रुपये लाच रक्कम नेवुन देणार असल्याबाबत मी, श्री. शिर्के, पोलीस उपअधीक्षक एसीबी सातारा यांना दिनांक 06/06/2019 रोजी फोन करुन माझी वरील प्रमाणे तक्रार असल्याचे कळविले. त्यावेळी श्री. शिर्के साहेब, पोलीस उपअधीक्षक यांनी मला दिनांक 07/06/2019 रोजी 11.00 वाजता महाराष्ट्र जिवन प्राधिकरण कार्यालयाचे समोरील रस्त्यावर येवुन थांबण्याची सुचना दिली.त्यानंतर श्री. शिर्के साहेब, पोलीस उपअधीक्षक यांनी दिनांक 07/06/2019 रोजी महाराष्ट्र जिवन प्राधीकरण कार्यालय कराड येथील समोरील रस्त्यावर येवुन माझ्याशी संपर्क

साधुन मला त्या ठिकाणी बोलावुन घेतले. त्यावेळी श्री. शिर्के साहेब, त्यांचे सापळा पथकासह खाजगी वाहनामध्ये हजर होते. त्याठिकाणी श्री. शिर्के साहेबांनी, माझी व जिल्हा क्रीडा अधिकारी सातारा कार्यालयातील 1) श्री.महेश मधुकर खुटाळे, क्रीडा मार्गदर्शक व 2) राजेंद्र भिमाशंकर अतनुर, क्रीडा अधिकारी, या दोन पंचांसह व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर मी, माझा लेखी तक्रारी अर्ज शिर्के साहेबांकडे हजर केला. त्याचे त्यांनी व दोन्ही पचांनी वाचन करुन त्यावर सहया केल्या. त्यानंतर माझ्या तक्रारीप्रमाणे माझ्याकडे लाच मागणी झाली अगर कसे? याची पडताळणी करण्यासाठी पंच नं. 1 म्हणुन खुटाळे व पंच नं. 2 म्हणुन अतनुर यांनी काम करण्याचे शिर्के साहेबांनी ठरवुन मला व पंच नं. 1 यांना सुचना देवुन व्हाईस रेकर्डरसह माझ्याकडील दुचाकी वाहनाने पंच नं. 1 यांचेसोबत माने साहेबांची भेट घेण्यासाठी रवाना करुन पडताळणी केली असता त्यामध्ये माने साहेब व माझी समक्ष भेट झाली. त्यावेळी माने साहेबांनी माझे सोमवार पेठ कराड न.भु.क्र. 168, 168/1 व 168/2 भुखंड एकत्रीकरण करण्याचे काम करुन देणेसाठी माझ्याकडे 2000/- रुपयाची लाच मागणी करुन ती लाच रक्कम लागलीच उपअधीक्षक, भुमिअभिलेख कार्यालय कराड येथे स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची रेकर्ड झालेल्या संभाषणावरुन व माझ्या तसेच पंच नं. 1 यांचे हकिकतीवरुन शिर्के साहेबांची व दोन्ही पंचांची खात्री झाली.त्यानंतर शिर्के साहेब यांचे सुचनेनुसार मी 2000/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई खाजगी वाहनातच केली. सापळा कारवाईसंबंधाने शिर्के साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकर्डर देवुन पंच नं.1 यांना माझ्या सोबत माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन माने साहेबांची भेट घेण्याकामी उपअधीक्षक, भुमिअभिलेख कार्यालय कराड येथे रवाना केले. आयोजित केले सापळा कारवाईमध्ये माझी व माने साहेबांची समक्ष भेट झाली. त्यावेळी माने साहेबांनी 2000/- रुपये लाच रक्कम न स्विकारता माझ्या कामाबाबत पुन्हा चर्चा करुन माने साहेब यांनी माझ्याकडे माझ्या कराड येथील तीन भुखंड एकत्रित करणचे काम करुन दिल्याचे मोबदल्यात तडजोडीअंती 13,000/- रुपयांची लाच मागणी करुन ती लागलीच भुमि अभिलेख कार्यालय कराड येथे आणुन देण्यास सांगितल्याची, रेकर्ड झालेल्या संभाषणावरुन व माझ्या तसेच पंच नं. 1 यांचे हकिकतीवरुन शिर्के साहेबांची व दोन्ही पंचांची खात्री झाली.त्यानंतर शिर्के साहेब यांचे सुचनेनुसार मी 13000/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई खाजगी वाहनातच केली. सापळा कारवाईसंबंधाने शिर्के साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर पुन्हा माझ्याकडे व्हाईस रेकर्डर देवुन पंच नं.1 यांना माझ्या सोबत माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन माने साहेबांची भेट घेण्याकामी उपअधीक्षक, भुमिअभिलेख कार्यालय कराड येथे रवाना केले.मी व पंच नं. 1 असे माझ्याकडील वाहनाने भुमी अभीलेख कार्यालय येथे आलो.त्याठिकाणी मी, वाहन पार्क करुन मी व पंच नं. 1 असे पायी चालत भुमी अभीलेख कार्यालयामध्ये माने साहेब बसतात त्याठिकाणी गेलो. परंतु तेथे माने साहेब त्याठिकाणी नव्हते. त्यामुळे मी, माने साहेब यांचे बाबत त्याठिकाणी असलेल्या इसमाकडे विचारणा केली असता, माने साहेब त्यांचे दुसरे ऑफिसला गेल्याचे समजले. त्यामुळे मी व पंच नं. 1 माझ्या माहीतीप्रमाणे दुचाकी वाहनाने कराड एसटी स्टन्डचे समोर असलेल्या प्रांत कार्यालयाचे आतमध्ये गेलो. तेथे मी, दुचाकी वाहन तेथील मोकळ्या जागेत पार्क केले. मी व पंच नं. 1 असे पायी चालत तेथील पहील्या मजल्यावर असलेल्या भुमी अभीलेख कार्यालयात गेलो. परंतु तेथेही माने साहेब नव्हते. त्या ठिकाणीही मी, माने साहेब यांचेबाबत चोॆकशी केली. त्यावेळी माने साहेब कार्यालयात आले नसल्याचे समजले, त्यामुळे मी व पंच नं. 1 असे पहील्या मजल्यावरील कार्यालयातुन खाली वाहनाजवळ आलो. त्यानंतर मी, माझ्या मोबाईल फोनवरुन माने साहेब यांना फोन लावला. त्यावेळी माने साहेब यांनी, मला ऑफिसमध्ये यायला अर्धा तास लागेल असे सांगितले. त्यामुळे आम्ही दोघे तेथुन माझ्याकडील वाहनाने पुन्हा उपअधीक्षक भुमी अभीलेख कार्यालय कराड येथे आलो. तेथे मी माझ्याकडील वाहन पार्क करुन आम्ही दोघे पायी चालत भुमी अभीलेख कार्यालयात माने साहेब बसतात त्याठिकाणी गेलो. तेथे माने साहेब नव्हते त्यामुळे आम्ही दोघे पुन्हा कार्यालयाचे बाहेर येवुन माने साहेब यांची वाट पहात थांबुन राहीलो. बराच वेळा झाल्याने मी माझ्या मोबाईल फोनवरुन माने साहेब यांना फोन केला. त्यावेळी माने साहेबांनी, मी वरच्या ऑफिसला येतो अर्धा तास लागेल असे सांगितले, त्यामुळे मी व पंच नं. 1 असे भुमी अभीलेख कराड कार्यालयाचे बाहेर माने साहेब यांची वाट पाहत थांबुन राहीलो. त्यानंतर काहीवेळाने माने साहेब कार्यालयामध्ये जात असल्याचे आम्हाला दिसले. त्यामुळे मी व पंच नं. 1 असे पायी चालत भुमी अभीलेख कराड कार्यालयात माने साहेब बसतात त्याठिकाणी गेलो. तेथे खुर्चीमध्ये माने साहेब बसलेले होते. त्यावेळी मी, माने साहेबांना, माने साहेब, करापलो उन्हात मी, असो म्हणालो. त्यावर माने साहेब यांनी बर असे म्हणाले, त्यावर मी, चहा घ्यायचा काय, काय करायच असे माने साहेबांना विचारले, त्यावर माने साहेब यांनी त्यांच्या उजव्या हाताचा अंगठा तर्जनिवर घासुन लाच मागणीचा सुचक इशारा करत, चहा नको असे म्हणाले, त्यावर मी माझ्या उजव्या हाताने शर्टच्या छातीवरील डाव्या खिशात ठेवलेली 13000/- रुपये लाच रक्कम काढुन माने साहेब यांच्या समोर धरुन मोजुन घ्या असे म्हणालो, त्यावेळी माने साहेब यांनी त्यांच्या समोरील टेबलाच्या डाव्या बाजुचा ड्रवर उघडुन, असु दे, ठिक आहे, ठेव हयात, असे म्हणुन लाच रक्कम टेबलाचे ड्रवरमध्ये ठेवण्याचा इशारा केला. त्यावर मी माझ्या हातातील लाच रक्कम, माने साहेब यांचे समोरील टेबलाचे डाव्या बाजुचे ड्रवरमध्ये ठेवली. त्यावेळी माने साहेब यांनी त्यांचे डाव्या हाताने सदरचा ड्रवर बंद केला. त्यानंतर मी, भुमी अभीलेख कराड कार्यालयाचे बाहेर येवुन माझा डावा हात डोक्यावरुन दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशार केला तो इशारा पाहुन श्री. शिर्के व पथक माझ्या जवळ आले. श्री. शिर्के साहेबांनी माझ्याकडील व्हईस रेकर्डर काढुन बंद केला व मला कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. काही वेळाने श्री. शिर्के साहेबांनी मला कार्यालयात बोलावुन माझी अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताचे बोटांचे पेऱ्यास व तळहातास तसेच माझ्या शर्टचे छातीवरील खिशाचे आतील बाजुस व कडांस अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर श्री. शिर्के साहेब यांनी मला कळविले की, श्री. माने, परिरक्षण भुमापक यांना ताब्यात घेवुन त्यांची कार्यालयातच तपासणी केली त्यावेळी श्री. माने यांचे टेबलचे डाव्या बाजुचे ड्रवरमध्ये अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर शिर्के साहेब यांनी श्री. माने यांना ताब्यात घेतले तसेच मी व पंच नं. 1 सोबतच्या वाहनांनी कराड येथील शासकिय विश्रामगृह येथे दाखल झालो. त्यावेळी शिर्के साहेबांनी मला विश्रामगृहाचे बाहेर थांबण्यस सांगितले. त्यानंतर श्री. शिर्के साहेब यांनी मला विश्रामगृहात बोलावुन घेवुन पंचांसमक्ष माझी अंगझडती घेतली. त्यानंतर शिर्के साहेबांनी, माझे व पंच नं. 1 खुटाळे यांचे सांगणेप्रमाणे संभाषणाचे स्क्रिप्ट मधील नामोल्लेख केला. त्यानंतर मला पुन्हा विश्रामगृहाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर काही वेळाने पुन्हा विश्रामगृहामध्ये बोलावुन घेवुन मला सदर हकिकत विचारली. सदर बाबत सविस्तर यशस्वी पंचनामा कराड येथील शासकिय विश्रामगृह येथे टकलिखीत करुन पुर्ण करण्यात आला आहे. तरी आनंदराव विठ्ठल माने, वय 35 वर्षे, परिरक्षण भुमापक, उपअधीक्षक भुमि अभिलेख कार्यालय कराड वर्ग - 3 रा. मु. निढवळ, पो. वडुज ता. खटाव जि. सातारा यांनी दिनांक 07/06/2019 रोजी पडताळणी व सापळा कारवाईवेळी माझ्याकडे माझे कराड येथील तीन भुखंड एकत्रित करण्याचे काम करुन दिल्याचे मोबदल्यात तडजोडीअंती 13,000/- रुपये लाच रक्कम मागणी करुन ती लाच रक्कम उप अधीक्षक, भुमि अभिलेख कराड कार्यालयात 17.14 वाजण्याचे सुमारास स्वत: स्विकारली आहे. म्हणून माझी त्यांचे ंविरुध्द तक्रार आहे.माझा वर

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:** **(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):** SARJERAO BABURAO GAIKWAD(I (Inspector)) / PDBN57165 **or**

(2) **Directed (Name of I.O.)** **(**तपास अधिका-याचे **Rank** **(**पद**):**

**No.**(क्र.)**:** **to take up the Investigation** **(**ला तपास करण्याचे अधिकार दिले**)** **or**

(3) **Refused investigation due to** **(**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** **(**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District** **(**जिल्हा**):**

**on point of jurisdiction** **(**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**)** .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** **(**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.**)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

**15.Date and time of dispatch to the court** **(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station** **(**ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** **(**नाम**):** SARJERAO BABURAO GAIKWA
**Rank**(पद)**:** I (Inspector)
**No.**(सं.)**:** PDBN57165

पोलीस स्टेशन ऑफीसर
कराड शहर पो. ठाणे, जि. सातारा
दि. ८/६/२०१९